## प्रकरण -3

## भारतीय राष्ट्रवाद

**प्रस्तावना :**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने 1757 ते 1857 अशी 100 वर्षे भारतीयांवर राज्य केले. हे करत असताना भारतीयांच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, प्रशासकीय व शैक्षणिक क्षेत्रात कंपनीने अनेक बदल केले. यामुळे भारतीय समाजात ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी विरुध्दचा असंतोष 1857 च्या स्वरूपात प्रकट झाला. भारत ही ब्रिटिशांची सर्वात मोठी वसाहत असल्याने व इथून मिळणारे उत्पन्नही खूप मोठ्या प्रमाणावर असल्याने ब्रिटिशांनी आपली सर्व शक्ती व ताकद पणाला लावून 1857 चा उठाव मोडून काढला. जसे अधिकार इंग्लंडमधील ब्रिटीश नागरिकाला आहेत तसेच अधिकार भारतातील सर्व नागरिकांना दिले जातील अशी ग्वाही राणीच्या जाहीरनाम्याद्वारे भारतीय समाजाला दिली गेली. नोकऱ्यांमध्ये, शिक्षणामध्ये, कायद्यासमोर सर्वांना समान संधी दिल्या जातील असे प्रतिपादन लॉर्ड कॅनिंग याने राणीच्या जाहीरनाम्याद्वारे भारतीयांना केले. तथापि पुढील काही काळात ब्रिटिशांना या गोष्टीचा विसर पडल्याचे दिसून येते. 1857 च्या उठावानंतर ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश पार्लमेंटकडे भारतातील राजकारण व सत्तेचे हस्तांतरण झाले. यानुसार ब्रिटिश पार्लमेंटने भारतमंत्री, व्हाईसरॉय, प्रांतिक गव्हर्नर व  ब्रिटिश व युरोपियन सनदी अधिकाऱ्यांच्या मार्फत भारताचे प्रशासन चालवले गेले.

ब्रिटिशांनी पाश्चात्त्य इंग्रजी शिक्षणाद्वारे भारतीय समाजाला समृद्ध केले व ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञान याबरोबरच पाश्चात्य देशातील विकास, क्रांत्यांचा परिचय भारतीयांना करवुन दिला. यामुळे भारतीयांना उदारमतवाद, वसाहतवाद, साम्राज्यवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, संसदीय शासन पद्धती व लोकशाही यासारख्या संकल्पना परिचित झाल्या. यातूनच भारतीय मध्यमवर्गीयांमध्ये राष्ट्रवादाच्या भावनेची जडण-घडण झाली.

1858 ते 1885 या काळात ब्रिटिश सरकारने भारतीयांचे विविध पद्धतीने राजकीय व आर्थिक बाबतीत शोषण केले. या काळात घडलेल्या घटनांमुळे परिस्थिती पुन्हा एकदा 1857 च्या उठावाप्रमाणे स्फोटक बनली. यातूनच ब्रिटिश भारतामध्ये विविध प्रांतात जमीनदारांच्या, कामगारांच्या, कारखानदारांच्या व राजकीय हेतूने प्रेरित झालेल्या संघटनांची निर्मिती झाली. एकूणच ब्रिटिशांच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक, प्रशासकीय व न्यायालयीन भेदभाव व अन्यायामुळे भारतामध्ये संघटित राष्ट्रवादाच्या उदयाची परिस्थिती निर्माण झाली.

**राष्ट्रवाद :**

प्रा. लुई स्नायडर यांच्या मते, "राष्ट्रवाद हा इतिहासाच्या विशिष्ट अवस्थेतील राजकीय, आर्थिक, सामाजिक व अनेक भौतिक घटकांचा परिणाम आहे. निश्चित स्वरूपाच्या भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या, समान भाषा बोलणाऱ्या, राष्ट्राच्या भावना व्यक्त करणारे साहित्य असणाऱ्या, समाज-रूढी-परंपरानी प्रभावित झालेल्या, क्वचित समान धर्म असणाऱ्या, आपल्या राष्ट्रपुरुषांचा गौरव करणाऱ्या लोकांची भावनात्मक अथवा मानसिक अवस्था म्हणजे 'राष्ट्रवाद' होय." राष्ट्रवाद म्हणजे आपल्या राष्ट्राबद्दल प्रत्येक व्यक्तीला वाटत असणारे प्रेम व आपल्या राष्ट्राबद्दलची असणारी निष्ठा होय. हॅन्स कोहन यांच्या मते, 'राष्ट्रवाद ही एक मानसिक अवस्था असून राष्ट्रवादाने भारावलेला जनसमूह म्हणजे राष्ट्र होय.' जॉन रँडल यांच्या मते, राष्ट्रीयत्व ही एक अशी भावना आहे की, ज्यासाठी माणसे प्राण द्यायला तयार होतात.

राष्ट्र आणि राष्ट्रभूमी यांना आदर्श मानून त्यांवर निष्ठा ठेवणारी आधुनिक राजकीय विचारप्रणाली व त्यावर आधारलेला ध्येयवाद म्हणजेच राष्ट्रवाद होय. एकोणिसाव्या शतकापासून यूरोपच्या इतिहासाला दिशा देणारी एक प्रमुख प्रेरणा म्हणून राष्ट्रवादाचा निर्देश करता येईल. हेच ऐतिहासिक कार्य राष्ट्रवादाने पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात आशिया खंडात आणि दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आफ्रिका खंडात पार पाडले आहे.

भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे असणारी सामाजिक, धार्मिक आणि भाषिक विविधता होय. परंतु येथील राष्ट्रवादानेच या विविधतेच्या विषमतेस एकत्रित बांधून ठेवण्याचे काम केले आहे. राष्ट्र या शब्दाला इंग्रजी मध्ये Nation असे म्हणतात. Nation हा शब्द लॅटिन भाषेतील Natus या शब्दापासून तयार झाला आहे. Natus म्हणजे एकाच वंशात जन्मलेले लोक जे राष्ट्र निर्माण करू शकतात.

बर्जेस यांच्या मते, 'भौगोलिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र असे म्हणतात.' लीकॉक यांच्या मते, 'वांशिक एकता असणाऱ्या लोकसमुदायाच्या राज्याला राष्ट्र होय.' एम. ह्यासर यांच्या मते, 'समान भाषा किंवा समान वंश यामुळे नव्हे, तर लोकांच्या एकत्रित राहण्याच्या इच्छेतून राष्ट्र निर्माण होते.'

**राष्ट्रवादासंबंधी भारतीय विचारवंतांची मते :**

**अरविंद घोष :**

भारतीय राष्ट्रवादाच्या प्रेषितांपैकी एक महत्त्वपूर्ण व्यक्ती म्हणून अरविंद घोष यांचे नाव घेता येईल. शुद्ध चारित्र्य, पराकोटीची राष्ट्रनिष्ठा, कमालीचा त्याग, विलक्षण बुद्धिमत्ता व मानवांच्या हिताची तळमळ हे गुण त्यांच्या अंगी ठासून भरले होते. अरविंद घोष यांना राष्ट्रवाद ही एक तपश्चर्या



Dr. S. R. Katimani History of Modern India

वाटते. ते राष्ट्रवादाला बद्दल म्हणतात की, 'राष्ट्रवाद हा केवळ राजकीय कार्यक्रम नाही, तर राष्ट्रवाद हा एक धर्म आहे की जो ईश्वराकडून प्राप्त झाला आहे. ज्याच्या आधारावर जिवंत राहावे असा हा विश्वास आहे. राष्ट्रवाद अमर आहे तो कधीच मरू शकत नाही. कारण ती मानवीय वस्तू नाही. राष्ट्रवाद हा धर्म आहे म्हणून राष्ट्रवादाकरिता व्यक्तींनी आपले सर्वस्व बलिदान करण्याची तयारी ठेवली पाहिजे. अरविंदजींचा राष्ट्रवाद संकुचित नव्हता तर व्यापक होता.

**स्वामी दयानंद सरस्वती :**

राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म होण्याच्या अगोदरपासून दयानंद सरस्वती यांनी स्वदेशी शासन, स्वदेशी वस्तू आणि हिंदू राष्ट्रवाद यांची घोषणा करून राष्ट्र जागृतीला सुरुवात केली होती.

**स्वामी विवेकानंद :**

रोमा रोलॉं, यांनी स्वामी विवेकानंदांना The Hindu Napoleon अशी पदवी दिली होती. विवेकानंद हे केवळ आदर्शवादाचे स्वप्न पाहणारे नव्हते. तर त्यांनी चारित्र्य निर्मिती, शिस्त आणि मनाची ताकद यावर त्यांनी अधिक भर दिला. त्यांच्या मते, मातृभूमी विषयीचे प्रेम ही अग्रक्रमाची बाब होय . 'Be Strong and be Fearless' असा संदेश त्यांनी देशातील युवकांना दिला होता.

**बिपिनचंद्र पाल:**

बिपिनचंद्र पाल हे एक निर्भीड देशभक्त, पत्रकार, लेखक आणि ओजस्वी वक्ते होते. भारतात साहसपूर्ण, स्वावलंबी आणि प्रखर राष्ट्रवादाचे ते प्रेषित म्हणून ओळखले जातात. बिपिनचंद्र पाल हे प्रखर राष्ट्रवादी होते. पाल यांच्या मते प्रत्येक राष्ट्राचा व्यक्तिगत आत्मा, व्यक्तिगत मानस आणि व्यक्तिगत संस्कृती असते. भारतीय राष्ट्रवाद आणि पाश्चात्त्य राष्ट्रवाद यातील अंतर स्पष्ट करताना ते म्हणतात, पाश्चात्त्य राष्ट्रवाद भौतिक साधनांवर आधारित आहे. व्यक्तिवाद आणि स्वतंत्र प्रतियोगिता हे पाश्चात्त्य राष्ट्रवादाचे मूळ तत्त्व आहे. भारतीय राष्ट्रवाद मात्र आपली प्राचीन संस्कृती व सभ्यतेच्या नैतिक आणि अध्यात्मिक आधारावर अधिष्ठित आहे. या दोन्ही गोष्टीचा त्याग भारतीय करू शकत नाही.

**भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे :**

**1. ब्रिटिशांचा एकछत्री अंमल :**

1707 मध्ये मोगल सम्राट औरंगजेबच्या मृत्यूनंतर मोगल साम्राज्याचे विघटन झाले. यामुळे भारतातील केंद्रीय राजकीय शक्तीचे विघटन होऊन स्थानिक संस्थाने व प्रादेशिक राज्यांची निर्मिती झाली. ब्रिटिश भारतात आल्यानंतर सुरुवातीस भारतीय व्यापाऱ्यांबरोबर व नंतर भारतीय सत्ताधीशांबरोबर त्यांचा संघर्ष झाला. यातूनच 23 जून 1757 रोजी प्लासीची लढाई झाली. यानंतर ब्रिटिशांनी 1857 पर्यंत तैनाती फौजेचा वापर, दरबारातील अराजकता, पेन्शन पदव्या रद्द करून व वारस नेमण्याचा अधिकार काढून घेऊन भारतीय संस्थांनांना ब्रिटिश साम्राज्यात खालसा केले. 1857 च्या उठावानंतर भारतीय संस्थानिकांकडे जरी 2/5 भुभाग असला तरी प्रत्यक्षात ते ब्रिटिशांचे मांडलिक होते. ब्रिटिशांनी व्यापार, परराष्ट्र व्यवहार व सैनिकी संरक्षण या संस्थानांच्या बाबी स्वतःकडेच ठेवून संस्थानिकांना राज्यकारभारातील अंतर्गत स्वायत्तता दिलेली होती. उर्वरित ब्रिटिश भारतात ब्रिटिशांनी व्हाईसराय, गव्हर्नर व सनदी अधिकाऱ्यांच्या मार्फत कायदा, शांतता, सुव्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण व्यवस्था व इतर प्रशासकीय कामकाजाची घडी बसवली. त्यामुळे ब्रिटीशांचा एकछत्री अंमल निर्माण झाला. तमाम भारतीयांना आपण सगळे एकाच शासकांची शासित जनता असल्याची भावना निर्माण झाली. पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, 'The political Unity established by British rule also gave birth to political consciousness and national Unity.' म्हणजेच ब्रिटिशांनी एवढ्या मोठ्या खंडप्राय भारतावर आपला एकछत्री अंमल निर्माण केल्याने वेगवेगळ्या जाती, धर्म, राज्य, प्रांत, चालीरीती व रूढी परंपरांनी विभागलेल्या समाजाला एकत्रित आणण्याचे काम झाले. तसेच भारतीय बहुजिनसी समाजामध्ये आपण सर्व एका राष्ट्राचे नागरिक आहोत अशी भावना उदयास आली.

**2. पाश्चात्य शिक्षणाचा प्रभाव :**

ब्रिटिशांच्या आगमनापूर्वी भारतामध्ये शिक्षण व्यवस्था ही जाती व धर्माशी संबंधित होती. त्यामुळे जातीनिहाय शिक्षण हे हिंदूना मंदिरांमधून व मुस्लिमांना मदरशातून दिले जात असे. त्यातही धर्म, कर्म, इतिहास, भाषाज्ञान, अंकगणित व तत्वज्ञानाचा समावेश होता. भारताच्या या पारंपारिक शिक्षण व्यवस्थेमध्ये विज्ञान-तंत्रज्ञान, औद्योगिक क्रांतीचा व पाश्चात्य विचारांचा समावेश नव्हता. ब्रिटिशांनी भारतात आल्यानंतर त्यांना मदतनीस म्हणून हव्या असणाऱ्या लोकांना जुजबी इंग्रजी ज्ञान दिले. नंतर इंग्रजी विषयाची व ब्रिटिश शिक्षणाची सक्ती भारतीयांवर केली. सुरुवातीस ख्रिश्चन मिशनऱ्यांनी अनेक शाळा- महाविद्यालये उघडून भारतीयांना ज्ञानदानाचे कार्य केले. 1813 च्या सनदी कायद्याने भारतीयांच्या शिक्षणासाठी प्रतिवर्षी कंपनीने एक लाख रुपये खर्च करावे असे ठरले. त्यानुसार नंतर प्रेसिडेन्सी शहरांमध्ये 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' ची स्थापना करण्यात आली. मुंबई मध्ये बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना शिक्षण प्रसारासाठी करण्यात आली. तसेच बंगाल, पंजाब व इतर प्रेसिडेन्सीमध्ये शाळा, महाविद्यालये व

शैक्षणिक संस्थांच्या निर्मितीने भारतात नवशिक्षित मध्यमवर्ग निर्माण झाला. या नवशिक्षित मध्यमवर्गीय तरुणांवर ब्रिटिशांच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व न्यायालयीन बदलांचा प्रभाव जाणवत होता.

पाश्चात्य शिक्षणाचा पुरस्कार करणारे भारतीय कायदे संहितेचे जनक 'लॉर्ड मेकॉले' यांच्या मते, 'पाश्चात्य उच्चविद्याविभूषित भारतीय लोक जेव्हा आपल्या देशासाठी ब्रिटिश संस्थांची मागणी करतील तो इंग्लंडच्या इतिहासातील अत्यंत अभिमानाचा दिवस ठरेल.' पाश्चात्त्य पद्धतीचे शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांकडूनच सर्वप्रथम स्वयम् शासनाची उस्फुर्त मागणी होईल असा मेकॉलेचा आशावाद होता. पाश्चात्य शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चात्त्य देशात घडून गेलेल्या क्रांत्यांचा परिचय झाला. इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स या देशात झालेल्या क्रांत्यांनी भारतीय समाजमन राष्ट्रवादाकडे झुकवले. मॉन्टेस्क्युचा 'सत्ता विभाजनाचा सिद्धांत', लॉक हॉब्ज यांचा 'सामाजिक करार सिद्धांत', हेगेलचा 'विरोध-विकासवाद' व रूसोने मांडलेल्या 'जनतेच्या सार्वभौमत्त्वाच्या' तत्वाचा प्रभाव मध्यमवर्गीय भारतीयांवर झाल्याने राष्ट्रवादाच्या निर्मितीची वैचारिक बैठक तयार झाली.

हर्बर्ट स्पेन्सर, वॉल्टेअर, जेम्स मिल, जेरोमी बेंथम, जॉन लॉक, थॉमस पेन, रुसो, व मोंटेस्क्यू सारख्या पाश्चात्त्य विचारवंतांनी मांडलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, उदारमतवाद, लोकशाही व मानवतावाद यासारख्या वैचारिक मूल्यांनी भारतीय मध्यमवर्ग प्रभावित झाला. जर्मनी व इटलीच्या एकीकरणाने व तेथील क्रांतिकारकांच्या योगदानाने भारतीयांमध्ये संघटित राष्ट्रवाद निर्माण केला.

**3. सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळ :**

यूरोपमध्ये निर्माण झालेल्या सामाजिक व धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळीने भारतीय नवशिक्षित तरुणांमध्ये भारतीय समाजातील कालबाह्य चालीरीती व रूढी परंपराबद्दल चीड निर्माण झाली. 'आधुनिक भारताचा शुक्रतारा' म्हणजेच 'राजा राममोहन रॉय' ज्यांनी 1829 मध्ये 'ब्राह्मो समाजाची' स्थापना केली. 4 डिसेंबर,1829 रोजी राजा राममोहन रॉय यांच्या पुढाकाराने लॉर्ड विल्यम बेंटिंग यांनी 'सतीबंदीचा कायदा' पारीत केला. सी. ए. बेली यांच्या मते, रॉय हे पहिले हिंदुस्तानी आहेत; ज्यांनी हिंदुस्थानातील स्वातंत्र्याचा विचार हा मानवतेचा अस्मितेचा, व्यापक जिज्ञासूवृत्तीचा अविभाज्य घटक आहे असे मानून प्रतिनिधित्व केले.

महात्मा फुले यांनी 21 सप्टेंबर, 1873 रोजी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाद्वारे समाजातील जातिव्यवस्था व वाईटप्रथा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. स्वामी दयानंद सरस्वती यांनी, 1875 मध्ये 'आर्य समाजाची' स्थापना केली. भारतातील ज्या हिंदू नागरिकांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारलेला होता किंवा धर्मपरिवर्तन केले होते, त्यांना परत हिंदू धर्माकडे आकर्षित करण्यासाठी 'धर्म शुद्धीकरण' चळवळ सुरू केली. 1893 मध्ये शिकागो येथील 'जागतिक धर्म' परिषदेमध्ये स्वामी विवेकानंदांनी भारतीय धर्म व संस्कृतीचे महत्त्व जगासमोर प्रकट केले. आपल्या विचारांच्या प्रसारासाठी रामकृष्ण मिशनची स्थापना केली. स्वामी विवेकानंदांनी युरोप व अमेरिकेमध्ये हिंदू धर्माची श्रेष्ठता सिद्ध केली. विवेकानंदांनी भारतीय संस्कृती ही पाश्चिमात्य संस्कृतीपेक्षा श्रेष्ठ असल्याचे इंग्रजांना सांगितले. त्यामुळे भारतीय समाजाला आपल्या धर्म व संस्कृतीवर विश्वास निर्माण झाला व आपण सर्व एका देशाचा रहिवासी असल्याचा अभिमान ते बाळगू लागले. एकूणच भारतीयांमध्ये भारतीय समाज, धर्म व संस्कृतीबद्दल अभिमान निर्माण करण्याचे काम सामाजिक व धार्मिक सुधारकांनी केले. सामाजिक व धार्मिक सुधारकांच्या प्रयत्नांनी भारतीयांमध्ये नवचैतन्य निर्माण केले. त्यामुळे समाजातील भेदभाव कमी होऊन समाज एकसंध होण्यास मदत झाली. 19 व्या शतकामध्ये ब्रिटीश कपंनी राजवटीअंतर्गत बालविवाह, सतीप्रथा व इतर जातीय भेदभावांवर टीका झाल्याने भारतीय समाजातील या कालबाह्य झालेल्या गोष्टी मोडण्यासाठीचे प्रयत्न झाले. भारतामध्ये सामाजिक व धार्मिक बदलांची ही नांदी होती; यातूनच नव्या स्वरूपातील भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीस सुरुवात झाली.

**4. वृत्तपत्रांचे योगदान :**

ब्रिटिशांनी बंगालमध्ये छापखाना सुरू केला. बी. एस. केशवन या इतिहासकारांच्या मते, बंगालमध्ये 1778 मध्ये छापले गेलेले पहिले पुस्तक म्हणजे नॅथॅनियल हाल्हेद यांचे 'ग्रामर ऑफ बेंगाली लँग्वेज' हे होय. यानंतर वीस वर्षांनी विल्यम कॅरे यानी भारतातील पहिला छापखाना त्यांच्या मिशनमध्ये श्रीरामपूर येथे बोटीने आणला. पहिल्या तीस वर्षात 40 भारतीय भाषांमधून धार्मिक पुस्तके, तत्वज्ञान विषयक पुस्तके, व्याकरण आणि शब्दकोशांची छपाई या छापखान्यातून झाली.

वृत्तपत्रे ही कोणत्याही देशाचे समाजमन असतात. जनमत तयार करण्याची किंवा बदलवण्याचे सामर्थ्य वृत्तपत्रांमध्ये असते. जगातील पहिले वृत्तपत्र 'लंडन गॅझेट' हे होय. जेम्स ऑगस्टस हिकी यांनी भारतातील पहिले वृत्तपत्र 'बंगाल गॅझेट'ची सुरुवात केली. यानंतर देशी भाषेतील पहिले वर्तमानपत्र फर्दुनजी मर्झबान यांनी 'मुंबई समाचार' या गुजराती वर्तमानपत्राने केली. 'दर्पण' हे महाराष्ट्रातील पहिले वर्तमानपत्र बाळशास्त्री जांभेकरांनी 6 जानेवारी 1832 रोजी सुरु केले.

इंग्रजी शिक्षणामुळे भारतात इंग्रजी व देशी भाषेतून अनेक वृत्तपत्रांची निर्मिती झाली. यामध्ये शिशिरकुमार घोष यांची 'अमृत बझार पत्रिका', राजा राममोहन रॉय यांचे 'संवाद कौमुदी', लाला लजपतराय यांचे 'द पीपल', सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांचे 'बंगाली', देवेंद्रनाथ टागोर यांचे 'इंडियन मिरर', बंकिमचंद्र चॅटर्जी यांचे 'बंगदर्शन' या वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या अन्याय, अत्याचार व शोषणाची माहिती समाजापर्यंत पोहचवण्याचे व भारतीय जनतेचा असंतोष ब्रिटिशांपर्यंत व अन्य प्रांतांमध्ये पसरवण्याचे काम केले. बंगालमधील 'हिंदू पेट्रीयट' या वृत्तपत्राने शेतमजुरांवरील अन्यायाला वाचा

Dr. S. R. Kattimani History of Modern India

फोडण्याचे काम अत्यंत साहसपूर्वक केले. भारतीय राष्ट्रवादाच्या उगमामध्ये काही अँग्लो-इंडियन वृत्तपत्रांनी भर घातली ज्यामध्ये स्टेटसमन, मद्रास मेल, पायोनियर व लाहोर गॅझेट यांची गणना करता येईल.

महाराष्ट्रात न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व गणेश वासुदेव जोशी यांनी 'ज्ञानप्रकाश' व 'इंदुप्रकाश' या वृत्तपत्राद्वारे महाराष्ट्रातील जनतेमध्ये ब्रिटिशांच्या कामकाजाची माहिती देण्याचे काम केले. लोकहितवादीनी भाऊ महाजनांच्या 'प्रभाकर' या वर्तमानपत्रातून शतपत्रे लिहिली. शतपत्राच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक व धार्मिक प्रश्नांवर पुरोगामी विचार मांडले. केसरी, मराठा व सुधारक या वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या राजवटीबाबत व त्यांच्या अन्याय व अत्याचाराबद्दल चीड उत्पन्न करण्याचे व सामाजिक जाणिवा प्रगल्भ करण्याचे काम केले. '1880 पर्यंत 34 मराठी व 2 इंग्लिश वृत्तपत्रे महाराष्ट्रात जनजागृतीची कामे नेटाने करत होती.' लोकमान्य टिळकांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात केसरी व मराठा या वृत्तपत्रांच्या अग्रलेखाच्या माध्यमातून ब्रिटिश राजकारणावर पद्धतीवर ताशेरे ओढले. राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे, सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय? अशा अग्रलेखाद्वारे भारतीय समाजातील असंतोषाची वाचा टिळकांनी फोडली. एकूणच भारतामध्ये राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी; ब्रिटिश प्रेसिडेन्सीमधील इतर राज्यांमध्ये घडणाऱ्या महत्त्वपूर्ण घटितांची माहिती समजल्याने भारतीयांमध्ये एकतेचे बीजांकुरण झाले असे म्हणावे लागेल.

**5. भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मितीतील साहित्याचे योगदान :**

भारतात संघटित राष्ट्रवाद निर्माण होण्यासाठी राष्ट्रीय साहित्य व साहित्यिकांचे खूप मोठे योगदान आहे. पाश्चात्य साहित्याच्या माध्यमातून विविध देशातील क्रांत्या, क्रांतिकारक व त्यांचे प्रेरणादायी जीवन भारतीयांना समजले. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन दीनबंधू मित्रा, हेमचंद्र बॅनर्जी, रमेशचंद्र दत्त, बंकिमचंद्र चॅटर्जी, रवींद्रनाथ टागोर या व अशा अनेक भारतीय राष्ट्रीय प्रवृत्तीच्या साहित्यिकांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या रोषाची पर्वा न करता भारतीयांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे व समाजजागृतीचे कार्य केले. बंकिमचंद्र चटर्जी यांनी लिहिलेल्या 'आनंदमठ' या कादंबरीतून उद्धृत केलेले 'वंदे मातरम' हे गीत तमाम भारतीयांच्या राष्ट्रीयतेचे प्रेरक बनले होते. महाराष्ट्रात विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी लिहिलेल्या निबंधमालेतून मराठी भाषेबद्दल व राष्ट्रीयतेबद्दल प्रेरणा निर्मितीचे काम केले. याच कालखंडात मॅक्सम्यूलर, विल्यम जोन्स व चार्लस विल्किन्सन यांसारख्या पाश्चात्त्य विद्वानांनी पौर्वात्यवादी दृष्टिकोनातून भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व साहित्याद्वारे भारतीयांपर्यंत पोहोचविले.

**6. इंग्रजांचे वांशिक श्रेष्ठत्व :**

ब्रिटिश हे गौरवर्णीय असल्याने कृष्णवर्णीय भारतीयांचा प्रशासनात व सार्वजनिक ठिकाणीही ब्रिटिशांकडून अपमान होत असे. 1857 च्या उठावापूर्वी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडून व अधिकाऱ्यांकडून असा वांशिक उद्दामपणा नेहमी होत असे. 1 नोव्हेंबर,1858 रोजी लॉर्ड कॅनिंग याने अलाहाबाद येथे दरबार भरवून राणीच्या जाहीरनाम्याद्वारे तमाम भारतीयांना धर्म, जात, वर्ण भेद न करता योग्यतेनुसार शिक्षणाच्या व नोकरीच्या संधी दिल्या जातील व समानतेची वागणूक दिली जाईल असे घोषित केले, परंतु असे झालेच नाही. गोऱ्या अधिकाऱ्यांकडून भारतीय कर्मचाऱ्यांची जाहीरपणे चेष्टा, मस्करी व अमानुष छळ केला जाई. ब्रिटिशांच्या वांशिक भेदभावामुळे अनेक ब्रिटिश व युरोपियन गुन्हेगार गंभीर दोष असूनही कायद्याच्या कचाट्यातून सहीसलामत सुटत. एकूणच ब्रिटिशांच्या भारतीयांना हीन लेखण्याच्या वर्तणुकीमुळे भारतीयांमध्ये आपण सर्वजण एक असल्याची भावना निर्माण झाली.

**7. ब्रिटिशांकडून भारतीयांचे आर्थिक शोषण :**

ब्रिटिशांनी कायमधारा, महालवारी, रयतवारी या महसूल पद्धतीद्वारे भारतीय शेतकऱ्यांकडून जमीन महसूल गोळा केला. परंतु हा महसूल रोखीने पैशाच्या स्वरूपात व सक्तीने गोळा केला जात असे. दुष्काळ, महापूर व साथीच्या रोगाच्या प्रसंगीदेखील शेतसाऱ्यामध्ये कोणत्याही प्रकारची सूट ब्रिटिशांकडून मिळत नसे. तसेच ब्रिटिशांकडून भारताच्या शेती सुधारण्यासाठीच्या जलसिंचनाच्या सोयी, सुधारित वाण, रासायनिक खते व तंत्रज्ञान यांसारख्या सुविधा दिल्या गेल्या नाहीत, त्यामुळे भारतीय शेतकऱ्यांची अवस्था बिकट बनली होती. भारत ही ब्रिटिशांसाठी कच्च्या मालाची निर्मिती करणारा व ब्रिटिशांचा तयार झालेला पक्का माल विकण्यासाठीची हमखास बाजारपेठ बनून राहिला होता. ब्रिटिशांनी विदेशी उद्योगधंद्यांना व उद्योजकांना प्रोत्साहित केल्याने भारतीय उद्योगधंद्यांवर जादाचे जकात बसवल्याने भारतीय उद्योगधंदे देशोधडीस लागले. भारतीय व्यापार व वाणिज्याचा ऱ्हास झाला. हस्तोद्योग डबघाईला आले व त्यावर जगणाऱ्या कारागिरांचे जीवन हालाखीचे बनले.

हेनरी कॉटन व विल्यम हंटर यांच्या मते, "मोगलांच्या काळात संपन्न असलेला हा देश 100 वर्षाच्या ब्रिटिशांच्या राजवटीत दारिद्र्याच्या गर्तेत लोटला गेला". ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे वाढत्या लष्करी व प्रशासकीय खर्चाचा बोजा भारतीय अर्थव्यवस्थेवर पडल्याने ती खीळखीळी बनली होती.

दादाभाई नौरोजी यांनी 'The Poverty & Un-British Rule in India' मध्ये 'The Drain Theory of Economy' हा सिद्धांत मांडला. ज्यामध्ये ते म्हणतात, मोहम्मद गजनीने सतरा वेळा स्वाऱ्या करून भारतातील जेवढी संपत्ती लुटली नाही त्याहीपेक्षा जास्त संपत्ती ब्रिटिश लोक प्रतिवर्षी भारतातून घेऊन जात आहेत. गेली कित्येक वर्षे ब्रिटिशांकडून भारतीयांची आर्थिक लूट होत आहे. भारतातील आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात

Dr. S. R. Kattimani History of Modern India

चौकशी करण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने फॉसेट यांच्या अध्यक्षतेखाली एक संसदीय समिती नेमली होती. या चौकशी समितीपुढे ब्रिटन व भारत यांच्या आर्थिक संबंधांच्या संदर्भात अतिशय तपशीलवार व अचूक माहिती मांडली.

रमेशचंद्र दत्त यांनी, 'ईकॉनॉमिक हिस्ट्री ऑफ इंडिया' या ग्रंथाद्वारे ब्रिटिश भारताच्या आर्थिक शोषणाचे चित्रण केले. एकूणच ब्रिटिशांनी भारतीयांचे जे आर्थिक शोषण केले त्यामुळे त्रस्त झालेल्या भारतीयांमध्ये आपल्यावर झालेल्या आर्थिक अन्यायाविषयी चीड निर्माण होऊन त्यांच्यामध्ये राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली.

**8. दळणवळण साधनांचा विकास:**

ब्रिटिशांनी व्यापार, वाणिज्य, लष्करी व प्रशासकीय सुलभतेसाठी दळणवळणाच्या साधनांचा विकास घडवून आणला. ब्रिटिशांनी मोठे व पक्के रस्ते तयार केल्याने ग्रामीण भाग शहराला जोडले गेले व त्यामुळे भारतीयांमधील दुरावा / अंतर कमी होऊन ते अनेक अर्थाने जवळ आले. ब्रिटिशांनी ठाणे ते बोरीबंदर अशी पहिली रेल्वे 1853 मध्ये सुरू केली. तसेच ब्रिटिशांनी सुरु केलेल्या तारायंत्र व पोस्ट ऑफिसेसमुळे दूर प्रांतामध्ये असलेल्या मित्र व आप्तेष्टांशी संवाद साधने भारतीयांना सुलभ झाले. इ.स.1900 पर्यंत 25000 मैल रेल्वे लोहमार्गाचे जाळे ब्रिटिशांनी निर्माण केले. ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या या सर्व दळणवळणाच्या साधनांमुळे भारताच्या विविध भागात राहणाऱ्या जनतेमध्ये एकजिनसीपणा निर्माण होण्यास मदत झाली. तसेच देशभरातून एक वैचारिक देवाण-घेवाण सुरू झाल्याने राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागली.

**9. लॉर्ड लिटनची अन्यायी कारकिर्द: (1876-80 )**

लॉर्ड लिटनच्या कालखंडात भारतामध्ये दोनदा मोठे दुष्काळ पडल्याने 50 लाख माणसांचा मृत्यू झाला. परंतु सरकारने मात्र याकडे दुर्लक्ष केले. दुष्काळामुळे अन्नपाण्यावाचून भारतीयांचा मृत्यू होत असताना लॉर्ड लिटनने 1 जानेवारी, 1877 रोजी दिल्लीमध्ये एक भव्य असा दरबार भरवला. या दरबारामध्ये राणी व्हिक्टोरियाला 'कैसर-ए-हिंद' म्हणजेच 'हिंदुस्तानची सम्राज्ञी' ह्या पदवीने सन्मानित करण्यात आले.

यासाठी भारतातील अनेक राजेरजवाड्यांना आमंत्रित केले होते व लॉर्ड लिटनने भरपूर पैसे खर्च केले होते. लॉर्ड लिटनच्या या अनास्थेमुळे भारतीय जनतेमध्ये असंतोष निर्माण झाला. यावेळी भारतीय वृत्तपत्रांनी लॉर्ड लिटनच्या या जुलमी व अन्यायी वागणुकीबद्दल वृत्तपत्रांतून लिखाण केल्याने त्यांच्यावर 1878 साली प्रेस ॲक्ट पास करून अनेक कडक निर्बंध घातले. लॉर्ड लिटनच्या व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्टने भारतीय मुद्रण स्वातंत्र्याची व अभिव्यक्ती स्वातंत्र्याची गळचेपी केली. 1878 मध्येच लॉर्ड लिटनने शस्त्रबंदी कायदा पारित करून भारतीयांना परवान्याशिवाय शस्त्र बाळगता येणार नाही असे निर्बंध घातले. या विपरीत युरोपियन व ब्रिटिश नागरिकांना विनापरवाना शस्त्र बाळगता येत होते. लॉर्ड लिटनच्या काळात 1879 मध्ये स्टॅट्यूटरी सिव्हील सर्विस कायदा पास केला. ज्याद्वारे भारतीय सनदी अधिकाऱ्यांची निवड करण्यासाठी इंग्लंडमध्ये घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेला बसण्याची वयोमर्यादा 21 वरून 19 वर आणली. लॉर्ड लिटनने कापड उद्योगावरील आयातकर रद्द केल्याने विदेशी कापड स्वस्त झाले व भारतीय कापडउद्योगावर याचे घातक परिणाम होऊ लागले त्यामुळे भारतीय व्यापारी व उद्योजकांमध्ये असंतोष निर्माण झाला. सुरेंद्रनाथ बॅनर्जी म्हणतात, 'लॉर्ड लिटनची राजवट एका अर्थाने वरदानच ठरली. त्यांच्या धोरणामुळेच भारतीय जनता जागृत झाली व राष्ट्रीय आंदोलनात उतरली.'

**10. इल्बर्ट बिल:**

1873 च्या सिव्हिल प्रोसिजर कोडनुसार मुंबई, मद्रास आणि कलकत्ता शहर सोडून हिंदुस्थानातील कोणत्याही हिंदी मॅजिस्ट्रेटला किंवा सेशन जज्जला युरोपियन माणसावर खटले चालवता येत नव्हते. हिंदुस्तानमधील न्याय क्षेत्रांमधील ही विषमता लॉर्ड रिपन या उदारमतवादी गव्हर्नर जनरलला दूर करायची होती. लॉर्ड रिपनच्या आदेशावरून हिंदुस्थान सरकारचा कायदा मंत्री इल्बर्ट याने हिंदी व युरोपियन मॅजिस्ट्रेटना समान पातळीवर आणण्याचे बिल तयार केले. या बिलाचे कायद्यात रूपांतर होण्याच्या दरम्यान भारतातील युरोपियन समाजाने लॉर्ड रिपनचा उघड-उघड निषेध केला व भारतीय समाजावर कडाडून हल्ला केला. हिंदी व युरोपियन समाजामध्ये संघर्ष होऊ नये यासाठी म्हणून लॉर्ड रिपनला या कायद्यात बदल करावा लागला. लॉर्ड रिपनने मूळ बिलात ज्युरी पद्धतीचा स्वीकार करून त्याचे कायद्यात रूपांतर केले गेले. इल्बर्ट बिलावरून युरोपियनांची भारतीयांप्रती असणारी वंश श्रेष्ठत्वाची भावना किती विकृत होती याची कल्पना भारतीयांना आली. तसेच युरोपियनांच्या संघटित चळवळीचा परिणाम ब्रिटिशांवर झाल्याने आपणही आपल्या अन्यायाविरुद्ध असा संघटनात्मक लढा देण्याची गरज भारतीयांना वाटू लागली. यातून संघटित राष्ट्रवादाची निर्मिती भारतीयांमध्ये बळावली.

**मूल्यमापन :**

अशाप्रकारे उपरोक्त वेगवेगळ्या कारणांनी भारतामध्ये राष्ट्रवादाचा उदय व विकास झाला. भारतीय राष्ट्रवादाच्या निर्मिती व विकासाचे अनेक पैलू आहेत. विविध जाती, धर्म, चालीरीती, रूढी, परंपरा, वेशभूषा, केशभूषा व खानपानाच्या सवयी असणाऱ्या या बहुजिनसी समाजाला राष्ट्रवादाद्वारे एका धाग्यामध्ये गुंफण्याचे काम केले गेले. पुढील काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून या विस्कळीत व संघटित राष्ट्रवादाचे रूपांतर राष्ट्रीय ऐकतेत होऊन भारताचा स्वातंत्र्यलढा निर्माण होऊ शकला.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेस :**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत ब्रिटिश भारतामध्ये विविध प्रेसिडेन्सी/ प्रांतामध्ये विशिष्ट लोकांच्या व गटाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी म्हणून अनेक राजकीय, शैक्षणिक व इतर संघटनांची निर्मिती झाली. परंतु याची व्याप्ती ठराविक प्रांतापूर्ती व गटापूर्ती असल्याने यामध्ये राष्ट्रवाद व राष्ट्रनिष्ठा आपल्याला पाहायला मिळत नाही. परंतु ही भरतातील संघटीत राष्ट्रवादाची व संघटनांच्या निर्मितीची सुरुवात होती. जसजसा ब्रिटिश भारतामध्ये राष्ट्रवादाचा विकास होत गेला तसा संघटनांचा विस्तार झाला. थोडक्यात, राष्ट्रवादाची निर्मिती, संघटितरीत्या प्रयत्नांची गरज या गोष्टींच्या गरजेतून झपाट्याने संघटनांच्या संख्येमध्ये वाढ झाली. तत्कालीन  सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक व राजकीय स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी ब्रिटिश भारतातील काही पुढाऱ्यांनी, विचारवंतांनी, सामाजिक व शैक्षणिक सुधारकांनी काही संस्थां व संघटनांची निर्मिती केली.

**राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपूर्वीच्या भारतातील संघटना :**

राजा राममोहन रॉय यांच्या सहकाऱ्यांनी 1836 मध्ये कलकत्ता येथे 'वंगभाषा प्रकाशिका' स्थापन केली. यानंतर 1837 मध्ये जमीनदारांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी 'जमीनदाराची संघटना' / 'लँड होल्डर्स असोसिएशन'  द्वारकानाथ टागोर यांनी स्थापन केली. जी भारतातील पहिली राजकीय संघटना म्हणून ओळखले जाते. 1839 मध्ये जॉर्ज थॉमसन यांनी लंडन येथे 'ब्रिटिश इंडिया सोसायटी' ही संघटना स्थापन केली. 1851 साली वरील दोन्ही संघटनांचे एकत्रीकरण करून 'ब्रिटिश इंडिया असोसिएशन' संघटना स्थापन केली गेली. ज्यामध्ये मध्यमवर्गीय व्यापारी, डॉक्टर, वकील यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता.

ब्रिटिश इंडियन असोसिएशन  संघटनेच्या कार्याच्या पार्श्वभूमीवर 1852 साली मद्रास येथे 'मद्रास नेटिव्ह असोसिएशनची' स्थापना करण्यात आली. 1853 या कायद्याच्या अगोदर या संघटनेने ब्रिटिश संसदेला मद्रास प्रांतातील शेतकऱ्यांवर होणारे महसूलाबाबतचे शोषण थांबवण्याबाबतचे निवेदन केले. तसेच कंपनीच्या गैरकारभाराबाबतची माहिती ब्रिटिश संसदेस निवेदनाद्वारे सादर केली.

1866 साली दादाभाई नौरोजी यांनी व्योमेशचंद्र बॅनर्जी यांच्या सहकार्याने भारतीय लोकांच्या अडचणींची ओळख ब्रिटिशांना करून देण्यासाठी इंग्लंडमध्ये लंडन येथे 'ईस्ट इंडिया असोसिएशनची' स्थापना केली. या संघटनेच्या शाखा मुंबई, मद्रास व कलकत्ता येथे स्थापन झालेल्या होत्या.

जगन्नाथ शंकर शेठ, भाऊ दाजी लाड व  दादाभाई नौरोजी यांच्या पुढाकाराने 'बॉम्बे असोसिएशनची' स्थापना 1852 मध्ये मुंबई येथे झाली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व गणेश वासुदेव जोशी म्हणजेच सार्वजनिक काका यांनी 2 एप्रिल, 1870 साली पुणे येथे सार्वजनिक सभेची स्थापना करून सामाजिक व राजकीय जागृतीचे कार्य केले. सार्वजनिक सभेने शेतकरी व कामगारांच्या समस्या, सरकारचे आर्थिक धोरण, स्वदेशी व स्वराज्याचा मूलमंत्र सर्वप्रथम जनतेपर्यंत पोहोचवला.

1875 मध्ये शिशिरकुमार घोष यांनी 'इंडियन लीग' नावाची संस्था स्थापन केली. 26 जुलै 1876 रोजी सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी देशव्यापी दौरा करून 'इंडियन असोसिएशनची' स्थापना केली. तसेच सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनी 'बंगाली' या वृत्तपत्राद्वारे लॉर्ड लिटनच्या गैरकारभारावर टीका केली.

1878 मध्ये एम.सुब्बाराव पंतलू, जी. सुब्रह्मण्य अय्यर व रंगय्या नायडू यांनी मद्रास मध्ये 'हिंदू' हे वृत्तपत्र सुरू केले. तसेच 1884 मध्ये 'मद्रास महाजन सभा' नावाची राजकीय संस्था स्थापन केली.

इल्बर्ट बिलाच्या वादावेळी युरोपियनांच्या संघटनात्मक शक्तीचे सामर्थ्य पाहून अखिल भारतीय संघटनेची आवश्यकता इंडियन असोसिएशनला वाटल्याने डिसेंबर 1883 मध्ये कलकत्ता येथे 'इंडियन नॅशनल कॉन्फरन्स' चे पहिले अधिवेशन बोलावले. सनदी परीक्षा, उच्च शिक्षण व कायदेमंडळातील प्रतिनिधी या प्रश्नांवर या अधिवेशनात चर्चा झाली. यावेळी देशभरातून शंभर प्रतिनिधी हजर होते. मुंबई येथे स्थापन झालेल्या राष्ट्रीय काँग्रेसमध्ये पुढे इंडियन नॅशनल कॉन्फरन्सचे  विलीनीकरण झाले.

ब्रिटिशांच्या पाश्चात्य उच्च शिक्षणाचे रसग्रहण करून भारतामध्ये एका नव्या मध्यमवर्गीय पिढीचा जन्म झाला. ज्यांनी पाश्चात्त्य, उदारमतवाद, स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवतावाद व लोकशाही सारख्या मानवी जीवनातील शाश्वत मूल्यांची मागणी संघटित प्रयत्नांद्वारे करण्यासाठी म्हणून विविध संघटनांची निर्मिती ब्रिटिश भारतामध्ये केली. त्यातूनच भारतामध्ये पुढील काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस सर्वसामान्य भारतीयांचे देशव्यापी प्रतिनिधित्त्व करणारी संघटना आकारास येऊ शकली.

**न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे:**

न्या. महादेव गोविंद रानडे हे एक प्रखर राष्ट्रभक्त होते. आपली मातृभूमी व तिच्या उज्ज्वल इतिहासाविषयी त्यांच्या मनात नितांत आदर होता. ब्रिटिश शासनाच्या न्यायालयीन सेवेत सातत्याने मग्न राहूनही भारतातील सामाजिक व राजकीय सुधारणांचा पाठपुरावा त्यांनी केला. न्या. रानडे यांच्या समोरील राजकीय ध्येय उदात्त होते. परंतु सार्वजनिक प्रश्नासंबंधी व राजकीय अडचणींसंबंधी व गाऱ्हाण्यासंबंधी दाद मागत असताना घटनात्मक

Dr. S. R. Kattimani History of Modern India

मार्गाचाच अवलंब केला पाहिजे असे त्यांचे मत होते. अर्ज, विनंत्या, वैचारिक मतपरिवर्तन ही साधने ते मानत होते. शिवाय ब्रिटिशांच्या उपजत न्यायबुद्धीवर त्यांची श्रद्धा होतीच म्हणून त्यांनी राजकीय चळवळीसाठी शांततामय व सनदशीर मार्गाची निवड केली.

भारतीय राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत रानडे यांचा सिंहाचा वाटा होता. राष्ट्रीय सभेचे संस्थापक सर ॲलन ओ ह्युम हे रानडे यांना स्वतःचे वैचारिक गुरु मानत असत. 16 जानेवारी, 1901 रोजी रानडे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. रानडे यांचे चरित्रकार जेम्स केलॉक यांच्या मते, “एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीयांनी ज्या राजकीय चळवळी चालवल्या होत्या, त्या सर्वांमागे रानडे यांची प्रेरणा असलेली दिसते.” न्यायमूर्ती रानडे यांना भारताचा संपूर्ण समतोल विकास व्हावा असे वाटत असे. रानडे यांच्या मते, देशाला प्रगतीच्या दिशेने जावयाचे असेल तर शांतता सुव्यवस्था व शिस्त आवश्यक आहे. ब्रिटिशांनी कायदा व प्रशासन पद्धतीने ही शिस्त बसवल्याने ब्रिटिश साम्राज्याबद्दल त्यांचे मत अनुकूल बनलेले होते. थोडक्यात सांगायचे झाल्यास राजा राम मोहन रॉय यांनी बौद्धिक, आध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात जे कार्य केले ते न्या.रानडे यांनी पुढे चालवले.

**ॲलन ह्युम व राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना :**

ॲलन ऑक्टेव्हियन ह्युम यांनी, 1870 ते 1879 या काळात गृह खात्याचे सचिव म्हणून कार्य केल्याने भारतीयांचा ब्रिटिशांप्रती असणाऱ्या असंतोषाची त्यांना कल्पना होती. म्हणूनच भारतात 1857 सारखा संभाव्य उठाव होऊ नये यासाठी भारतीय मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणांना विधायक कार्याकडे ओळखण्याची गरज ह्युम यांनी ओळखली होती.

“ब्रिटिश साम्राज्य वरून वाटते तितके सुस्थिर नाही आणि हिंदी लोकात राज्यासंबंधी तीव्र असंतोष माजला असता त्याच्या वणव्यात याची राखरांगोळी होणे शक्य आहे.” असे ब्रिटिश अधिकारी अँलन हयूम यांचे मत बनले होते.

विल्यम वेबरडर्न यांनी वासुदेव बळवंत फडके यांचे बंड पाहिले होते. हिंदी समाजामध्ये या असंतोषातून असे अनेक वासुदेव बळवंत निर्माण होतील असे त्यांना वाटत होते. “हिंदुस्थानातील ब्रिटिश राज्य तलवारीच्या जोरावर टिकलेले नाही व लोक ते चालू देतात म्हणून चालू शकते” असे त्यांचे मत होते.

1 मार्च, 1883 रोजी ए. ओ. हयूम यांनी, कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना संदेश देतांना देश प्रेमासाठी पन्नास तरुणांची मागणी त्यांनी केली. त्यानुसार देशप्रेमाने भारावलेले काही बंगाली तरुण व्ह्यूम यांना भेटले. त्यांनी 1884 मध्ये ‘इंडियन नॅशनल युनियन’ ची स्थापना केली. 1884 मध्येच ए.ओ. ह्युम इंग्लंडला गेले व तिथे लॉर्ड नॉर्थब्रूक व लॉर्ड रिपन ह्या उदारमतवाद्याची भेट घेतली. व त्यांनी भारतीयांचा असंतोष ब्रिटिशांपर्यंत यावा यासाठी एका देशव्यापी संघटनेची गरज असल्याचे त्यांच्यासमोर स्पष्ट केले.

ह्युमच्या या कार्याला लॉर्ड नॉर्थब्रूक व लॉर्ड रिपन ह्या दोघांकडून प्रोत्साहन मिळाल्याने भारतात आल्यानंतर त्यांनी व्हॉईसरॉय लॉर्ड डफरीन यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर उपरोक्त गोष्टींची चर्चा केली. लॉर्ड डफरीनने इंग्लंडमधील विरोधी पक्षासारखे ब्रिटिश प्रशासनातील दोष भारतीय विचारवंतांनी व सुधारकांनी संघटनेच्या माध्यमातून (Safety Valve) व्यक्त करावी असे मत प्रकट केले, व ॲलन ह्युम यांच्या कार्याला पाठिंबा दर्शवला. यानुसार भारतातील वेगवेगळ्या संघटनांना पत्रे पाठवून त्यांना प्रतिनिधी पाठवण्याची विनंती केली.

**भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना:**

28 डिसेंबर 1885 रोजी मुंबईच्या गोकुळदास तेजपाल संस्कृत विद्यालयांमध्ये देशभरातील 72 प्रतिनिधींनीसह भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. काँग्रेसचे पहिले अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी हे होते. “काँग्रेसच्या स्थापनेच्या वर्षाच्या अधिवेशनाला महाराष्ट्रातील म्हणजेच मुंबई इलाख्यातील 27 प्रतिनिधी उपस्थित होते. या अधिवेशनाला फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, दिनेश भाई वाच्छा, न्यायमूर्ती तेलंग, लोकमान्य टिळक, रंगया नायडू, नरेंद्रनाथ सेन ,डॉ. भांडारकर, आगरकर, अय्यर,जी सुब्रमण्यम व गंगाप्रसाद वर्मा ह्या प्रमुख नेत्यांचा समावेश होतो”.

राष्ट्रीय काँग्रेसचे स्वरूप जातीय व धार्मिक नसून ते पूर्णपणे राष्ट्रीय होते. राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी हे ख्रिस्ती होते, कलकत्त्याच्या दुसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी हे पारशी होते, तर तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष बद्रुद्दीन तय्यबजी हे मुस्लीम होते. ॲलन ह्यूम हे युरोपियन असून राष्ट्रसभेचे ते जनकच मानले जातात.

**पहिले अधिवेशन :**

राष्ट्रीय काँग्रेसचे पहिले अधिवेशन हे तीन दिवस चालले. यावेळी अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी व सचिव ॲलन ह्युम यांनी काँग्रेसच्या ध्येय धोरणाबाबत भाषणे केली. 28 डिसेंबर 1885 रोजी मुंबई येथे भरलेल्या काँग्रेसच्या पहिल्या अधिवेशनामध्ये विचारविनिमयानंतर पुढील 9 ठराव पास झाले.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

1. इंग्रज सरकारने हिंदुस्थानातील राज्य कारभाराची चौकशी करण्यासाठी एक रॉयल कमिशन नियुक्त करावे. ज्यामध्ये योग्य प्रमाणात हिंदी प्रतिनिधिंची संख्या असावी.

2. इंडिया कौन्सिलचा खर्च अनाठाई असल्याने ते रद्द करण्यात यावे.

3. केंद्रीय व प्रांतिक कायदे मंडळात अधिक प्रमाणावर हिंदी लोकप्रतिनिधी घ्यावेत. अंदाजपत्रके' कायदे मंडळापुढे मांडावीत. सभासदांना प्रश्न विचारण्याचा अधिकार असावा.

4. पंजाब व वायव्य प्रांतात विधिमंडळे प्रस्थापित केली जावीत.

5. लष्करावरील खर्चात कपात करणे व इंग्लंडने खर्चाचा बरोबरीचा वाटा उचलणे.

6. शासकीय सेवा स्पर्धा परीक्षा इंग्लंड आणि भारतात घेणे तसेच त्यासाठीची वयोमर्यादा मर्यादा 19 हुन 23 करावी.

7. मिठावरील कर रद्द करावा

8. ब्रह्मदेश खालसा करू नये.

9. भारतीय उद्योगधंद्यांच्या संरक्षणार्थ भारतीय मालासाठी जकातीच्या सवलतींचे संरक्षण मिळावे.

काँग्रेसचे अधिवेशन दरवर्षी डिसेंबरच्या अखेरीस देशाच्या वेगवेगळ्या भागात भरवण्यात यावे. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या या मागण्या जुन्याच होत्या परंतु या मागण्यांना अखिल भारतीय संघटनेचे स्वरूप नव्हते. काँग्रेसच्या स्थापनेमुळे या मागण्यांना संघटनात्मक बळ मिळाले. जरी सुरुवातीला काँग्रेसमध्ये मूठभर सुशिक्षित लोकांचा भरणा असला तरी नंतर सर्वसामान्य लोकांचा समावेश राष्ट्रीय काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणावर झाला. ब्रिटिश सनदी अधिकारी ॲलन हयूम यांच्या पुढाकाराने राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाल्याने राष्ट्रीय सभा ही ब्रिटिश धार्जिणी असल्याचा आरोप त्यावर केला गेला, परंतु संभाव्य सरकारी विरोध टाळणे हा राष्ट्रीय सभेचा हेतू होता.

**मूल्यमापन :**

काही इतिहासकारांच्या मते, राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात भारतीय नेत्यांनी पुढाकार घेतला होता त्यांना देशव्यापी व्यापक संघटनेची गरज भासत असल्याने भारतीय नेत्यांनी राष्ट्रसभेची स्थापना केली. लॉर्ड डफरीन यांना सुरुवातीस असे वाटले की, काँग्रेस फक्त सामाजिक क्षेत्रातच कार्य करेल, परंतु नंतर त्यांचा अंदाज चुकला असल्याची जाणीव त्यांना झाली. डॉ. पट्टाभी सीतारामय्या यांच्या मते, “काँग्रेसच्या स्थापनेची मूळ कल्पना कोणाची हे अजूनही एक गूढच राहिले आहे.”

सी. एफ. अँड्रयूज व मुखर्जी यांनी ‘Rise and Growth of Congress in India’ या ग्रंथामध्ये राष्ट्रीय काँग्रेसच्या उगामासंबंधी ‘Safety Valve Theory’ कथन केली. ज्यामध्ये ते म्हणतात की, भारतीय मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणांना आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले तर त्यांच्या मनातील असंतोषाची भावना कमी होऊ शकते म्हणूनच काँग्रेसची निर्मिती करण्यात ब्रिटिशांनीच पुढाकार घेतला.

महात्मा गांधींचे राजकीय गुरू गोपाळकृष्ण गोखले म्हणतात, देशातील विद्यमान परिस्थिती लक्षात घेता कोणत्याही भारतीय व्यक्तीच्या पुढाकाराने कायम स्वरूपाची राजकीय संघटना स्थापन होणे अशक्य होते. कारण तसा प्रयत्न केल्यास साम्राज्यवादी ब्रिटिश नोकरशाहीने मुळातच तो चिरडून टाकला असता. ॲलन ह्यूम यांच्या ह्या संघटनेला ब्रिटिशांचा पूर्ण पाठिंबा होता व राजकीय स्वातंत्र्य मिळवणे हे प्रारंभीच्या काळात काँग्रेसचे ध्येय हे मुळीच नव्हते. ब्रिटिश शासनाच्याबाबतचा भारतीयांच्या मनातील असंतोष सनदशीर मार्गाने दूर करण्यासाठीच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली. रजनी पाम दत्त यांच्या 'इंडिया टुडे' या ग्रंथात ते म्हणतात, “काँग्रेसची स्थापना ही एक पूर्वनिश्चित गुप्त स्वरूपाच्या ब्रिटिश सरकारच्या योजनेनुसार झाली”. थोडक्यात सांगायचे झाल्यास भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेबाबत इतिहासकारांमध्ये व समकालीन नेत्यांमध्ये मतभिन्नता दिसून येते. असे असले तरी राष्ट्रीय सभेचे स्वरूप शेवटपर्यंत राष्ट्रीयच राहिले आणि त्याचे उद्देश आणि ते उद्देश साध्य करण्याची साधने मात्र कालपरत्वे नेहमीच बदलत गेली.

**दुसरे अधिवेशन:**

भारतीय जनतेचा असंतोष एखाद्या संघटनेच्या माध्यमातून व्यक्त करून त्यातील हवा काढून घ्यावी असा लॉर्ड डफरीन यांचा उद्देश होता. यालाच Safety Valve म्हणजे सुरक्षा झडपेची कल्पना असे म्हणतात. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे दुसरे अधिवेशन 1886 मध्ये दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली कलकत्ता येथे संपन्न झाले. यामध्ये देशभरातून 426 प्रतिनिधी हजर होते. खरे तर अधिवेशनाला आलेले प्रतिनिधी हे आपापल्या प्रांतातून लोकशाही प्रक्रियेने आलेले होते.

Dr. S. R. Katmari History of Modern India

**दुसरे अधिवेशन:**

भारतीय राष्ट्रीय सभेचे दुसरे अधिवेशन 1886 मध्ये कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याला देशभरातून 426 प्रतिनिधी हजर होते. या अधिवेशनात असे ठरले की यापुढे राजकीय व्यासपीठ म्हणून काँग्रेसने कार्य करावे. दुसऱ्या अधिवेशनाला उपस्थित राहिलेले प्रतिनिधी हे आपापल्या प्रांतातून लोकशाही प्रक्रियेने आले होते. तसेच या प्रतिनिधींना स्वतः व्हॉईसरॉय लॉर्ड डफरीनने मेजवानी दिली होती.

**तिसरे अधिवेशन :**

तिसरे अधिवेशन मद्रास येथे 1887 साली बद्रुद्दिन तैय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. याला देशभरातून 607 प्रतिनिधी उपस्थित होते.

**राष्ट्रीय सभेचे चौथे अधिवेशन :**

राष्ट्रीय सभेचे चौथे अधिवेशन अलाहाबाद येथे 1888 साली स्कॉटिश व्यापारी जॉर्ज युल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी 1248 प्रतिनिधी देशभरातून उपस्थित होते. हे अधिवेशन होऊच नये यासाठी सरकारतर्फे अनेक अडचणी निर्माण करण्यात आल्या. सर सय्यद अहमद खान यांनीही या अधिवेशनात मुस्लिमांनी सहभागी होऊ नये यासाठी प्रयत्न केले. परंतु कशासही न जुमानता अधिवेशनास 200 मुस्लिम प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी ब्रिटिश सरकारकने राष्ट्रीय सभेच्या कार्यकर्त्यांकडून चांगल्या वर्तनबाबतची हमी घेतली. जुलै 1889 मध्ये राष्ट्रीय सभेची एक शाखा लंडन येथे सुरू करण्यात आली.

**राष्ट्रीय सभेचे पाचवे अधिवेशन :**

राष्ट्रीय सभेचे पाचवे अधिवेशन 1889 साली सर विल्यम वेडरबर्न यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे भरले. ब्रिटिश पार्लमेंटनेही राष्ट्रसभेच्या कार्याची दखल घेऊन त्यासंबंधी चर्चा केली. काँग्रेसच्या या अधिवेशनास देशभरातून 1889 प्रतिनिधी उपस्थित होते.

**नेमस्त/ मवाळवादी कालखंड: (1885-1905)**

1885 मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. 1885 ते 1905 हा वीस वर्षाचा कालखंड मवाळवादी कालखंड म्हणून भारतीय इतिहासात ओळखला जातो. स्थापनेनंतर सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय काँग्रेसने ज्या सनदशीर मार्गाचा अवलंब केला, त्यामुळे त्यांना नेमस्त असे संबोधले जाऊ लागले. यामध्ये सुरेंद्रनाथ बॅनर्जी, न्या.महादेव गोविंद रानडे, फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, व्योमेशचंद्र बॅनर्जी, गोपाळ कृष्ण गोखले, न्यायमूर्ती तेलंग, दिनेशभाई वाच्छा या भारतीय नेत्यांचा समावेश होतो. राष्ट्रीय सभेचे हे सर्व सदस्य उच्चविद्याविभूषित होते. यामध्ये प्राध्यापक, वैद्यकीय व्यवसाय करणारे व कायदेपंडित म्हणजेच बुद्धिजीवी वर्गाचा समावेश राष्ट्रीय सभेत होता. त्यामुळे मध्यम वर्गातील या राष्ट्रीय सभेच्या मवाळवादी नेत्यांचा पाश्चिमात्यांशी संपर्क आलेला होता.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या आरंभीच्या काळात नेमस्तानी म्हणजेच मवाळवाद्यांनी भारतीय स्वातंत्र्याचे स्पष्ट उद्दिष्ट समोर न ठेवता ब्रिटिशांशी प्रत्यक्ष संघर्ष न करता शासनामध्ये जास्तीत जास्त सहभाग घेऊन अन्यायी करप्रणाली रद्द करण्यास ब्रिटिशांना भाग पाडणे, सामाजिक, आर्थिक व राजकीयदृष्ट्या सर्व भारतीयांना एकत्रित आणण्याचे काम राष्ट्रीय सभेच्या नेमस्तानी केले.

मवाळवादी नेत्यांचा ब्रिटिशांच्या न्याय व सदसद्विवेकबुद्धीवर पूर्ण विश्वास होता. तसेच ब्रिटिशांच्या लोकशाही शासनप्रणालीबद्दल आदर होता. हे त्यांच्या उदारमतवादाने प्रभावित झालेली असल्याने विरोधापेक्षा समन्वयात्मक मार्गाने जबाबदार शासन पद्धती मिळवण्याकडे यांचा कल होता.

**नेमस्तांची / मवाळांची कार्यप्रणाली:**

1.1885 ते 1905 या काळात राष्ट्रीय सभेने काँग्रेसची विचारसरणी ही सनदशीर मार्गाने चळवळ करणे, जनतेमध्ये राजकीय जागृती करण्यापुरती मर्यादित ठेवली.

2. भारतीय जनतेच्या समस्या अर्ज व विनंत्याद्वारे सरकारपर्यंत पोहचवणे.

3. नेमस्तांचा ब्रिटिशांच्या न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याने भारतीय लोकांमध्ये विविध प्रश्नांवर जनजागृती करत असताना ब्रिटिश शासनाबद्दल भारतीयांच्या मनात कटूता निर्माण होऊ नये असा प्रयत्न त्यांनी केला. तसेच ब्रिटिशांनाही भारतीयांच्या विरोधाची जाणीव होऊ दिली नाही.

4. ब्रिटिशांमुळे भारतीयांची आर्थिक प्रगती झाली. भौतिक सुधारणा व शिक्षणप्रसारामुळेच भारतीयांचा विकास होईल असा विश्वास असल्याने ब्रिटिश शासन हे भारतीयांसाठी 'ईश्वरी वरदान' असल्याची भूमिका मवाळांनी घेतली होती.

Dr. S. R. Katimani History of Modern India

5. भारतीय राष्ट्रसभेच्या मवाळवादी नेत्यांना ब्रिटिशांच्या लोकशाही व उदारमतवादी तत्वप्रणालीवर विश्वास असल्याने क्रमाक्रमाने व टप्प्याटप्प्याने भारताला स्वातंत्र्य मिळेल असा आशावाद यांना होता.

**राष्ट्रसभेचे कार्य/ मवाळांचे योगदान (1885 ते 1905):**

**1. भारतीयांच्या राष्ट्रीय मागण्यांचे प्रतिनिधित्व:**

राष्ट्रीय सभेने स्थापनेपासून प्रारंभीची वीस वर्षे भारतीयांच्या मागण्यांचे प्रतिनिधित्व केले. भारतीयांच्या समस्या राष्ट्रीय स्तरावर ब्रिटिशांसमोर मांडल्या. जनतेमध्ये राजकीय जागृती घडवून आणली. त्यामुळे भारतीयांमध्ये आत्मविश्वास वाढला. राष्ट्रीय सभेच्या सभासद संख्येमध्ये वाढ झाली. भारतीयांच्या आर्थिक व सामाजिक समस्या ब्रिटिश पार्लमेंटसमोर मांडून औद्योगिक विकास, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे राजकीय विकास, स्पर्धा परीक्षा भारतात घेण्यासाठीचे निवेदन देऊन त्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी जनमत निर्माण केले.

**2. पाश्चात्त्यांच्या विचारांचा प्रभाव:**

मवाळवादी लोकांमध्ये दादाभाई नौरोजी, सुरेंद्रनाथ बॅनर्जी, उमेशचंद्र बॅनर्जी हे सर्व पाश्चात्त्य शिक्षण घेतलेली उच्चविद्याविभूषित असणारे नेते असल्याने ब्रिटिशांचा न्याय प्रणालीवर त्यांचा विश्वास होता. ब्रिटिशांचा उदारमतवाद, लोकशाही व घटनात्मक विकास यांचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता. ब्रिटिशांच्या सहकार्याशिवाय भारताचा विकास होणे अवघड असल्याची त्यांची धारणा होती.

**3. राष्ट्रवादी भावनेची वाढ:**

अखिल भारतीय स्तरावर जनतेच्या समस्यांना ब्रिटिशांपर्यंत पोहोचवणारी एकही संघटना या काळात नव्हती. भारतीय राष्ट्रीय सभेच्या रूपाने नवशिक्षित मध्यमवर्गीय मवाळवादी नेत्यांनी भारतीय जनतेत राष्ट्रवाद व नवचैतन्य  निर्माण केले. ब्रिटिश भारतातील मुंबई, मद्रास, कलकत्ता अशा वेगवेगळ्या प्रांतातून आलेल्या परंतु, समान विचारसरणी असलेल्या राष्ट्रसभेच्या मवाळ नेत्यांनी लोकांमध्ये राष्ट्रीय एकता निर्माण करण्याचे काम केले. भारतीयांच्या समस्यांना एक राष्ट्रीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

**4. ब्रिटिश प्रशासनातील त्रुटी जनतेसमोर मांडल्या:**

राष्ट्रीय सभेच्या दादाभाई नौरोजी यांनी 'द्रव्यापहरणाच्या सिद्धांताद्वारे'/'आर्थिक नि:सारणाच्या सिद्धांताद्वारे' ब्रिटिश भारतीयांची कशी आर्थिक लूट करत आहेत याची आकडेवारी मांडून जनतेला ब्रिटिश प्रशासनाचे खरे स्वरूप दाखवून दिले. राष्ट्रीय सभेने या काळात वृत्तपत्रांमधून ब्रिटिशांच्या जुलमी व अन्यायी प्रशासकीय धोरणांचे परिणाम विशद केले. तसेच सभा आयोजित करणे, पत्रके वाटणे, भारतीय प्रश्नांबाबत आकडेवारी व प्रबळ पुराव्याद्वारे भारतीयांच्या विविध समस्यांप्रती जागृती निर्माण करण्याचे महत्वपूर्ण काम केले. थोडक्यात, कायद्याच्या चौकटीत राहून भारतीय राष्ट्रसभेच्या मवाळवादी लोकांनी ब्रिटिश सत्तेचे खरे स्वरूप भारतीय जनतेसमोर प्रकट केले.

**5. राष्ट्रीय काँग्रेसचे इंग्लंडमधील कार्य:**

ब्रिटिश भारताचे भवितव्य ठरवण्याचा व त्याबाबतचे निर्णय घेण्याचा अधिकार ब्रिटिश पार्लमेंटला असल्याने इंग्लंडमध्ये भारतीय प्रश्नांना वाचा फोडणे व तेथील उदारमतवादी जनतेमध्ये भारतीय समस्यांबद्दलची जाण व त्याबद्दल अनुकूल मत निर्माण करून आपले प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रसभेने कार्य केले. दादाभाई नौरोजी यांनी, इंग्लंडमध्ये 1887 साली 'इंडियन रीफॉर्म असोसिएशन' ही संघटना स्थापन केली व या संघटनेद्वारे हिंदी लोकांचे प्रश्न इंग्लंडमध्ये मांडण्याचा प्रयत्न केला.

1888 साली 'डिग्बी' यांच्या मार्गदर्शनाखाली लंडनमध्ये एक समिती स्थापन करण्यात आली. भारतीयांबद्दल सहानुभूती असणाऱ्या ब्रिटिश व्यक्तींशी संपर्क साधून त्यांचे सहकार्य मिळवणे हे उद्दिष्ट ठेवले गेले. यासाठी एक शिष्टमंडळ ब्रिटनला पाठवण्यात आले. दादाभाई नौरोजी यांनी इंग्लंडमधील हेनरी कॉटल, विल्यम वेडरबर्न, चार्लस ब्रेडलॉ या उदारमतवादी संसद सदस्यांचे सहकार्य मिळवले. 1889 मध्ये या समितीचे रूपांतर 'ब्रिटिश कमिटी ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' मध्ये झाली. विल्यम वेडरबर्न हे या संघटनेचे अध्यक्ष व 'डिग्बी' हे सचिव होते. या संघटनेसाठी काँग्रेस वर्षाला तीन हजार पौंड इतका खर्च करत असे. भारतीयांच्या प्रश्नावर इंग्लंडमध्ये व्याख्याने आयोजित करणे, परिपत्रके काढून ब्रिटिशांपर्यंत पोहोचवून त्याद्वारे जनमत निर्माण करणे ही कामे या संघटनेने केली. या समितीने 1890 मध्ये 'इंडिया' नावाचे वृत्तपत्र सुरू केले.

1893 मध्ये ब्रिटिश संसदेत 'इंडियन पार्लमेंटरी कमिटी, स्थापन करण्यात आली. यामध्ये 114 ब्रिटिश संसद सदस्य सभासद होते. ही समिती काँग्रेसच्या मागण्यांसाठी ब्रिटिश सरकारवर दबाव आणत होती. 1889 ते 1906 या काळात चार शिष्टमंडळे इंग्लंडला पाठवण्यात आली. गोपाळकृष्ण गोखले, लाला लजपतराय, बॅरिस्टर जीना, फिरोजशहा मेहता व सुरेंद्रनाथ बॅनर्जी या नेत्यांनी शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. या काळात राष्ट्रीय सभेने हिंदी जनतेच्या समस्या ब्रिटीशांपर्यंत पोहोचवण्याचे काम केले.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

**6. इंडिया कौन्सिलबाबतचे कार्य:**

1858 च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार, ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश पार्लमेंटकडे सत्तेचे हस्तांतरण झाले. यानुसार 15 सदस्यांचे 'भारत मंडळ' म्हणजेच 'इंडिया कौन्सिल' स्थापन करण्यात आले. ब्रिटिश पार्लमेंटने यासाठी भारतमंत्र्यांची नेमणूक केली. या सर्वांचे वेतन भारताच्या तिजोरीतून दिले जात असे. यासाठी 35 लाख रुपये इतका खर्च होत असे. ब्रिटिशांच्या इतर वसाहतींचा कारभार पाहण्यासाठी 'वसाहत मंत्री' नेमला जात असे, परंतु त्याचे वेतन ब्रिटिश संसदेद्वारे दिले जात होते. भारताबाबतही असेच धोरण असावे अशी काँग्रेसने सुरुवातीपासून मागणी करून पहिल्या अधिवेशनात याबाबत ठरावही पास केला.

**7. परदेशातील भारतीयांच्या समस्यांकडे लक्ष वेधले:**

ब्रिटिश साम्राज्यावरील सूर्य कधी मावळत नव्हता, म्हणजेच ब्रिटिशांचे साम्राज्य जगभर पसरले होते. ब्रिटिश सरकारने भारतात स्वस्त मजूर उपलब्ध होत असल्याने हिंदी मजुरांना इतर ब्रिटिश वसाहतीत कामासाठी पाठवले होते. परंतु तेथे त्यांची पिळवणूक केली जात असे. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांवर डोईजड कर आकारले होते. त्यांच्या मतदानाचा अधिकार काढून घेतला होता. असे असले तरी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला या लोकांकडून नियमितपणे वर्गणी मिळत होती. नेमस्त नेत्यांनी 1894 च्या मद्रास अधिवेशनामध्ये या लोकांच्या हिताकडे लक्ष पुरवण्यासाठी भारत सरकारला विनंती करणारा ठराव मंजूर केला. तसेच आफ्रिकेत जाऊन सत्याग्रह केले. यामुळे परदेशातील भारतीयांकडून भारतीय स्वातंत्र्य चळवळीला पुढील काळात मोठी मोलाची मदत झाली.

**8. वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय:**

भारतीय राष्ट्रीय सभेचे 1885 ते 1905 या काळात सनदशीर मार्गाने ब्रिटिशांसमोर आपल्या मागण्या मांडल्या. परंतु बदलत्या परिस्थितीमध्ये ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाने व लॉर्ड कर्जनच्या दडपशाही धोरणामुळे राष्ट्रीय काँग्रेसनेही आपल्या धोरणात बदल केला. बदलत्या परिस्थितीमध्ये 1905 च्या वाराणसी येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात गोपालकृष्ण गोखले यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये वसाहतीचे स्वराज्य हे काँग्रेसचे ध्येय राहील असे जाहीर केले. यानंतर 1906 मध्ये दादाभाई नौरोजींनी त्यांचा पुनरुच्चार केला.

**9. 1892 चा इंडिया कौन्सिल ॲक्ट:**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या 1885 पासून होणाऱ्या प्रत्येक अधिवेशनामध्ये भारतीयांच्या राजकीय व प्रशासकीय सहभागाच्या वाढीबाबत अनेक मागण्या केल्या गेल्या. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रयत्नांमुळेच 1892 चा कायदा ब्रिटिशांना पारित करावा लागला. 1892 च्या कायद्याने मध्यवर्ती आणि प्रांतिक कायदेमंडळातील सभासदांची संख्या वाढवली. तसेच 1892 च्या कायद्याने अप्रत्यक्ष का होईना परंतु निवडणुकीचे तत्व मान्य केल्यामुळे शिक्षित आणि देशप्रेमाने प्रेरित असे भारतीय नागरिक कायदेमंडळात जाऊ लागले. एकूणच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या दबावामुळेच ब्रिटिशांना 1892 चा कायदा पारित करावा लागला व भारतामध्ये संसदीय लोकशाहीची पायाभरणी केली गेली असे म्हणावे लागेल.

**मवाळवादी नेत्यांच्या कार्याचे मूल्यमापन:**

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही भारताची पहिली राजकीय संघटना होय. ज्याद्वारे अखिल भारतीय जनतेच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम केले. भारतीयांच्या समस्या अर्ज विनंत्या व सनदशीर मार्गाद्वारे ब्रिटिशांपर्यंत पोहोचवून त्याबाबत जनमत निर्माण करण्याचे काम केले. लोकशाही, राष्ट्रवाद, उदारमतवाद या संकल्पनांचा भारतीयांना परिचय करून दिला. सर्व जाती, धर्म, वंश, भाषा, पंथांच्या लोकांसाठी एक खुले मोठे व्यासपीठ निर्माण करून दिले. लोकांमध्ये राजकीय सहभागाबाबतची जागृती निर्माण केली. मवाळांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामासाठी एक राजकीय व आर्थिक कार्यक्रम लोकांना दिला.

मवाळांच्या कार्यपद्धतीवर अनेकांनी प्रखर अशी टीकाही केली आहे. लाला लजपतराय यांनी, "20 वर्षाच्या प्रयत्नानंतर काँग्रेसच्या हाती भाकरी ऐवजी दगड आले. तसेच इंग्रज धार्जिणी, दिखाऊ राष्ट्रभक्तीचा चैतन्यहीन तमाशा, स्वातंत्र्याऐवजी सवलती मागणारी टोळी" अशी टीका मवाळवादी लोकांच्या कार्यप्रणालीवर केली.

वास्तविक या काळात राष्ट्रसभा ही बाल्यावस्थेत होती. ब्रिटिशांना प्रखर विरोध करून स्वातंत्र्याची मागणी केली असती तर स्वातंत्र्यही मिळाले नसते व ब्रिटिशांच्या रोषामुळे राष्ट्रसभेला अनधिकृत ठरवून त्यावर बंदी घातली गेली असती. कारण पुण्याच्या सार्वजनिक सभेचे काँग्रेसपुढे असे उदाहरण होते. राष्ट्रसभेचे मवाळवादी नेते नामदार गोखले यांच्या मते, "मवाळांनी स्वातंत्र्य मागितले नाही, परंतु भविष्यात अशी मागणी करण्यासाठीची अनुकूलता निर्माण केली."

| **प्रश्न 1 .  रिकाम्या जागा भरा.** | | | | **अचूक उत्तर** |
|---|---|---|---|---|
| 1. भारतीय प्रबोधनाचे जनक____________ यांना संबोधले जाते. | | | | |
| अ)  महात्मा फुले | ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर | क)  छ. शाहू महाराज | ड)  राजा राम मोहन रॉय | ड |
| 2. 1853 मध्ये कावसजी दावर यांनी भारतातील पहिली कापड गिरणी ____________ येथे सुरू केली. | | | | |
| अ) कलकत्ता | ब) मुंबई | क) आग्रा | ड) दिल्ली | ब |
| 3. रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बंगालची स्थापना कोणी केली ? | | | | |
| अ) लॉर्ड कर्जन | ब) विल्यम बेंटिक | क) विल्यम जोन्स | ड) लॉर्ड वेलस्ली | क |
| 4.  'नीलदर्पण' या नाटकाचे लेखन कोणी केले? | | | | |
| अ) दीनबंधू मित्रा | ब) रोमेशचंद्र दत्त | क) महात्मा फुले | ड) किशोरचंद्र मित्र | अ |
| 5. 1837 मध्ये जमीनदाराची संघटना____________ ह्या प्रांतात स्थापन झाली. | | | | |
| अ)  बंगाल | ब) मद्रास | क)  मुंबई | ड)  उत्तर प्रदेश | अ |
| 6.  काँग्रेसच्या स्थापनेचे श्रेय____________ यांना देण्यात येते. | | | | |
| अ)  न्यायमूर्ती रानडे | ब)  लोकमान्य टिळक | क)  ॲलन ह्यूम | ड)  लॉर्ड डफरीन | क |
| 7.  काँग्रेसच्या स्थापनेवेळी____________ हा व्हाईसरॉय  होता. | | | | |
| अ)  लॉर्ड कर्जन | ब)  लॉर्ड डफरीन | क)  लॉर्ड रिपन | ड)  लॉर्ड लिटन | ब |
| 8. काँग्रेसचे पहिले अध्यक्ष पद____________यांनी भूषवले. | | | | |
| अ) ॲलन ह्यूम | ब) वेडनबर्ग | क) व्योमेशचंद्र बॅनर्जी | ड) लॉर्ड डफरीन | क |
| 9.1902 मध्ये हरिद्वारजवळ गुरुकुलची स्थापना कोणी केली? | | | | |
| अ) महात्मा हंसराज | ब) स्वामी विरजानंद | क) स्वामी दयानंद | ड) स्वामी श्रद्धानंद | ड |
| 10. 1839 मध्ये तत्वबोधिनी सभेची स्थापना____________ यांनी केली. | | | | |
| अ) प्रसन्नकुमार टागोर | ब) ईश्वरचंद्र विद्यासागर | क) देवेन्द्रनाथ टागोर | ड) केशवचंद्र सेन | क |
| 11. विधवा विवाहाच्या समर्थनासाठी  गुजराती भाषेमध्ये सत्यप्रकाश नावाची पत्रिका____________यांनी काढली. | | | | |
| अ) बाळशास्त्री जांभेकर | ब) म. ज्योतिबा फुले | क) फिरोजशहा मेहता | ड) बी. एम. मलबारी | अ |
| 12. इंडियन सिविल सर्विस ICS ची परीक्षा पास होणारे प्रथम भारतीय____________ हे होय. | | | | |
| अ) सत्येंद्रनाथ टागोर | ब) प्रसन्नकुमार ठाकूर | क) सुभाष चंद्र बोस | ड) सुरेंद्रनाथ बॅनर्जी | अ |
| 13. भारतासाठीचा 'पहिला फॅक्टरी ॲक्ट' कधी पारित झाला? | | | | |
| अ) 1891 | ब) 1881 | क) 1879 | ड) 1871 | ब |
| 14. 1835 मध्ये____________ ने भारतीय वृत्तपत्रांवरील बंधने रद्द केल्याने त्याला भारतीय वृत्तपत्राचा मुक्तिदाता असे संबोधले जाते. | | | | |

Dr. S. R. Kattimani History of Modern India

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ) लॉर्ड डलहौसी | ब) एलेनबरो | क) लॉर्ड मेकॉले | ड) चार्लस मेटकाफ | ड |
| 15. व्हर्न्याक्यूलर प्रेस ॲक्ट कधी पारित करण्यात आला? | | | | |
| अ) 1858 | ब) 1905 | क) 1911 | ड) 1878 | ड |
| 16. इ. स. 1866 मध्ये दादाभाई नौरोजी यांनी ईस्ट इंडिया असोसिएशनची स्थापना___________ येथे केली. | | | | |
| अ) लंडन | ब) दिल्ली | क) कलकत्ता | ड) मुंबई | अ |
| 17. 'ग्रंड ओल्ड मॅन ऑफ इंडिया' म्हणजेच भारताचे पितामह असे कोणाला म्हटले जाते? | | | | |
| अ) सुरेंद्र बॅनर्जी | ब) दादाभाई नौरोजी | क) आनंद मोहन बोस | ड) महात्मा गांधी | ब |
| 18. पुणे येथे सार्वजनिक सभेची स्थापना कोणी केली? | | | | |
| अ) गोपाळ कृष्ण गोखले | ब) महात्मा फुले | क) न्यायमूर्ती रानडे | ड) फिरोजशहा मेहता | क |
| 19. अमृत बझार पत्रिका _____________ यांनी सुरू केली. | | | | |
| अ) राजा राममोहन राय | ब) शिशिरकुमार घोष | क) सुरेंद्रनाथ बॅनर्जी | ड) लाला लजपत राय | ब |
| 20. बाळशास्त्री जांभेकर यांनी _____________ हे वृत्तपत्र सुरु केले. | | | | |
| अ) दर्पण | ब) निबंधमाला | क) केसरी | ड) मराठा | अ |
| 21. द्रव्यापहरणाचा सिद्धांत _____________यांनी मांडला . | | | | |
| अ) लोकमान्य टिळक | ब) दादाभाई नौरोजी | क) फिरोजशहा मेहता | ड) रवींद्रनाथ टागोर | ब |
| 22. वंदे मातरम हे गीत _____________ या कादंबरीत समाविष्ट केले आहे. | | | | |
| अ) रामायण | ब) हिंदुस्थान | क) आनंदमठ | ड) भगवद्गीता | क |
| 23. डॉन या इंग्रजी वृत्तपत्राचे संपादक_____________ हे होते. | | | | |
| अ) श्यामाप्रसाद बॅनर्जी | ब) लोकमान्य टिळक | क) अरविंद घोष | ड) सतीश चंद्र मुखर्जी | ड |
| 24. 19 व्या शतकात यंग बंगाल मुव्हमेंटची स्थापना ___________यांनी केली. | | | | |
| अ) रसिक कुमार मलिक | ब) राम्ताणु लहिडी | क) हेन्री व्हिव्हीयन डेरोजियो | ड) पियरीचंद्र मित्रा | क |
| 25. राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना ___________रोजी झाली. | | | | |
| अ) 2 नोव्हेंबर, 1887 | ब) 28 डिसेंबर, 1885 | क) 1 जानेवारी, 1880 | ड) 31 डिसेंबर, 1886 | ब |

**प्रश्न 2 . खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (दीर्घोत्तरी प्रश्न)**

1. भारतीय राष्ट्रवादाच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.
2. 1885 ते 1905 या काळातील राष्ट्रीय कॉंग्रेसमधील मवाळवादी नेत्यांचे योगदान स्पष्ट करा.
3. भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या स्थापनेचा वृत्तांत लिहा.

Dr. S. R. Kattimani History of Modern India

**प्रश्न 3. टिपा लिहा**

1. लॉर्ड लिटन
2. इल्बर्ट बिल
3. राष्ट्रीय कॉंग्रेसचे पहिले अधिवेशन
4. कॉंग्रेसच्या निर्मिती पूर्वीच्या भारतातील संघटना
5. आधुनिक वृत्तपत्रे व राष्ट्रवाद
6. सामाजिक धार्मिक सुधारणा चळवळी व राष्ट्रवाद

Dr. S. R. Kattimani History of Modern India